मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरीतील दहा चौक कोंडीमुक्त

## विविध उपाययोजनांचा परिणाम झाल्याचा महापालिका प्रशासनाचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी होणाऱ्या २५ चौकांतील कोंडी सोडविण्यासाठी महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी उपाययोजना हाती घेतल्या आहेत. पहिल्या टप्प्यात दहा चौकांमध्ये वाय जंक्शन संकल्पना, वाहनांसाठी मार्गिका, बोलार्ड बसविणे, संकेतचिन्हे, रस्ता रेषांकन, दुभाजक, एकेरी वाहतूक, रस्ता रुंदीकरण करण्यात आले. त्यामुळे या चौकांतील वाहतूक शिस्तबद्ध झाली असून, चौक कोडींमुक्त झाल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.

पिंपरी-चिंचवड ही उद्योगनगरी असून, येथे अनेक कारखान्यांसह हिंजवडी, तळवडे माहिति तंत्रज्ञाननगरी, नामांकित शाळा, महाविद्यालये आहेत. त्यामुळे वाहनांची संख्याही अधिक असते.



बेशिस्त वाहनचालक, रस्त्यालगतच्या अतिक्रमणांमुळे सकाळी व सायंकाळी अनेक रस्त्यांवर वाहतूक कोंडी होते. या कोंडीमुळे वाहनचालकांना मनस्ताप होतो.

ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक विभाग आणि महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाने ८० चौकांची पाहणी केली. त्यात २५ चौक कोंडीचे आढळले. राज्य शासनाच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमात वाहतूक कोंडीच्या २५ चौकांपैकी पहिल्या टप्प्यात दहा चौकांतील कोंडी सोडविण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यामध्ये चौकांची नव्याने रचना करण्यात आली. अतिक्रमण हटविले.

वाय-जंक्शनद्वारे सुस्पष्ट रस्ता विभाजन, रस्ते दुरुस्ती, दुभाजक, स्पष्ट रस्ता रेषांकन करून वाहनासांठी मार्गिका, काही चौकांमध्ये वाहतूक नियंत्रण दिवे (सिग्नल), एकेरी मार्ग, चौकांमधील सर्कल काढले, रस्ते रुंद केले, पादचारी, सायकलस्वारांसाठी स्वतंत्र मार्गिका करण्यात आल्या. चौकात वाहतुकीच्या दृष्टीने बोलार्ड बसविण्यात आले. दिशादर्शक, खबरदारीचे फलक बसविण्यात आले. त्यामुळे चौकातून वाहनांना निश्चित मार्गाने जावे लागत आहे. परिणामी, वाहतूक शिस्तबद्ध झाली. चौकात कोंडी होत नाही. चौकातील वाहतूक पूर्वीपेक्षा सुकर, विनाअडथळा होत आहे.

### कोंडीमुक्त झालेले दहा चौक

» मुकाई चौक, रावेत अशुद्ध जलउपसा केंद्र, पुनावळे जंक्शन, ताथवडे चौक, वखार महामंडळ चौक, शिवार चौक, स्वराज्य, घरकुल, त्रिवेणीनगर आणि आकुर्डीतील खंडोबा माळ परिसरातील वाय जंक्शन हे दहा चौक कोंडीमुक्त झाल्याचा महापालिका प्रशासनाचा दावा आहे.

“ शहरातील दहा चौकांत कोंडी सोडविण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमुळे वाहतूक सुरळीत झाली आहे. चांगले परिणाम दिसून येत आहेत. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील चाकण, म्हाळुंगेतील एचपी, सूस पाषण पूल येथेही उपाययोजना केल्या आहेत. गर्दीच्या वेळी वाहतूक अंमलदाराची नेमणूक केली जात आहे. त्यामुळे चौक पार करण्याची वेळ कमी झाली आहे.

**- बापू बांगर, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड.**

# थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची थेट कारवाई

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर थकबाकीदारांना अंतिम इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागामार्फत शहरातील मालमत्ता कर थकबाकीदारांना थकीत रक्कम भरणेबाबत यापूर्वीच मालमत्ता कर थकबाकीदारांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण ८, नियम ४१ व ४२ अन्वये जप्तीपूर्वीची अंतिम नोटीस बजावण्यात आली आहे. तथापि चालू वर्षाचे मालमत्ता कराचे बिलाचे वाटप सुरू असून मागील आर्थिक वर्षात मालमत्ता कर भरण्याची अंतिम मुदत पहिल्या सहामाहीसाठी ३० सप्टेंबर आणि दुसऱ्या सहामाहीसाठी ३१ डिसेंबर अशी होती अशा ७१,९९९ (एका हत्तर हजार नऊशे नव्यांनऊ ) थकबाकीदारांनी निर्धारित वेळेत कर भरलेला नसल्यामुळे,या थकबाकीदारांवर प्रत्येक महिन्यासाठी २ टक्के शास्ती (दंड) लागू करण्यात आली आहे. जी संपूर्ण थकबाकी भरणेपर्यंत लागू राहणार आहे. अशा थकबाकीदारांना चालू वर्षाचे बिलासोबत अंतिम जप्तीपूर्व नोटीस



वाटपाचे काम सुरू आहे.

महापालिकेने स्पष्टपणे कळवले आहे की, मार्च २०२५ पूर्वीची मालमत्ता कर बिलाची थकबाकी असणाऱ्या ७१,९९९ (एका हत्तर हजार नऊशे नव्यांनऊ) थकबाकीधारकांना नोटीस प्राप्त झाल्यानंतर केवळ ७ दिवसांची अंतिम मुदत देण्यात येणार आहे. मालमत्ता थकबाकीदारांना महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून (WWW.PCMCINDIA.GOV.IN) ऑनलाइन पेमेंट गेटवे, RTGS, BBPS किंवा विभागीय कार्यालयांतील थेट भरणा केंद्रांद्वारे रक्कम भरता येईल. आर्थिक अथवा अन्य कारणास्तव कर भरता न आल्यास समाधानकारक कारण लेखी स्वरूपात ७ दिवसांत महापालिकेस सादर करणे आवश्यक आहे.

जर या कालावधीत महापालिकेच्या करसंकलन विभागीय कार्यालयात अथवा ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर न भरल्यास किंवा ती भरण्याबद्दल समाधानकारक कारण न दाखवल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित मालमत्तेवर थेट जप्तीची आणि कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली जाईल. तसेच यामध्ये मालमत्तेचा ताबा घेऊन लिलाव करण्याची तरतूदही समाविष्ट असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

# पुण्यात 111 हून अधिक पाकिस्तानी नागरिक

## पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सध्या एकूण 111 पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास

**पुणे | प्रतिनिधी**

व्हिसावर भारतामध्ये आलेल्या १११ पाकिस्तानी नागरिकांचे सध्या पुण्यामध्ये वास्तव्य आहे. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने घेतलेल्या कठोर निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील या नागरिकांची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भारतात व्हिसावर आलेल्या या नागरिकांमध्ये मुस्लिम, सिंधी आणि हिंदू समाजाच्या व्यक्तींचा समावेश आहे.




पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ निरपराध भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर देशभरामध्ये संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत भारतामध्ये वास्तव्यास असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत देश सोडण्याचा आदेश दिला आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सध्या एकूण १११ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास आहेत. ५६ महिला आणि ३५ पुरुष दीर्घकालीन व्हिसावर भारतात आले आहेत, अशी माहिती विशेष पोलीस शाखेकडून देण्यात आली.

विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते म्हणाले, 'केंद्र सरकारच्या आदेशानंतर शहरातील सर्व पाकिस्तानी नागरिकांची माहिती संकलित करण्यात येत असून, त्यांच्याकडे असलेल्या व्हिसा आणि इतर कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. केंद्र सरकारच्या घोषणेनंतर आतापर्यंत तीन पाकिस्तानी नागरिकांनी पुणे पोलिसांच्या परकीय नागरिक नोंदणी कार्यालयाकडून (एफआरओ) 'एक्झिट' प्रमाणपत्र घेतले असून, लवकरच ते भारत सोडून जाणार आहेत. उर्वरित नागरिकांच्याही परतीच्या प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे.' दरम्यान, कोणत्याही अनुचित प्रकाराला आळा बसावा आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून, परकीय नागरिकांशी संबंधित सर्व घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

> पाकिस्तानी नागरिकांनी ४८ तासांत देश सोडून जावे, असा आदेश केंद्र सरकारने दिला आहे. मात्र, अद्याप स्थानिक पोलिसांना त्या अनुषंगाने कोणताही आदेश प्राप्त झालेला नाही. आदेश प्राप्त होताच त्यानुसार तातडीने कार्यवाही करण्यात येईल.
>
> **- रंजनकुमार शर्मा, पोलीस सहआयुक्त.**

# सराइतांवरील 'अदखलपात्र' गुन्ह्यांचीही 'दखल'

## गुन्हेगारांना मोकळे न सोडण्याचे आयुक्तांचे पोलीस ठाण्यांना आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

'सराइतांवर दाखल किरकोळ स्वरूपाचे गुन्हे अदखलपात्र स्वरूपात (नॉन कॉग्निजेबल ऑफेन्स – एनसी) मोडतात. मात्र, अशा गुन्ह्यांतील बारकावे तपासून पाहावेत. गुन्हेगारांना मोकळे न सोडता त्यांच्याविरुद्ध दखलपात्र गुन्हे दाखल करावेत,' असे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना दिले आहेत.

दखलपात्र गुन्हे दाखल केल्यास सराइतांवर भविष्यात करण्यात येणारी कारवाई परिणामकारक होण्यास मदत होणार आहे. 'शहरातील गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी गुंडांविरुद्ध कारवाईसाठी उपाययोजना हाती घेतल्या आहेत. शहरातील ३७ हजार सराइतांचे वास्तव्याचे ठिकाण, त्यांचे नातेवाइक, तसेच अन्य माहिती संकलित करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.




गुन्ह्यांचे स्वरूप विचारात घेऊन ३७ हजार सराइतांची माहिती १५ विभाग करून संकलित करण्यात आली आहे. त्यापैकी ४,४०० गुंड पोलिसांच्या सर्वोच्च यादीत (टॉप लिस्ट) आहेत. शहरात गस्त घालणाऱ्या पोलिसांच्या पथकाला गुन्हेगारांची नियमित तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना सराइतांची यादी देण्यात आली असून, त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याची सूचना देण्यात आल्या आहेत,' अशी माहिती गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांनी दिली.

'बऱ्याचदा सराइतांकडून नागरिकांना धमकावणे, मारहाण करणे असे गुन्हे केले जातात. अशा प्रकारचे गुन्हे अदखलपात्र स्वरूपात मोडतात. मात्र, आता अशा प्रकारचे गुन्हेही नीट तपासून सराइतांविरुद्ध दखलपात्र गुन्हे दाखल करण्याचा आदेश देण्यात आला आहे. गुन्हेगाराविरुद्ध दखलपात्र स्वरूपाचे गुन्हे दाखल झाल्यास त्याच्याविरुद्ध भविष्यात 'एमपीडीए' (झोपडपट्टीदादा प्रतिबंधक कायदा), 'मकोका' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा), तसेच तडीपारीची कारवाई अधिक परिणामकारक पद्धतीने करता येईल,' असे बलकवडे यांनी नमूद केले.

### तडीपार गुंडांवर नजर

» दहशत माजविणाऱ्या गुंडांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार केले जाते. तडीपार केल्यानंतर सराईत पुन्हा शहरात वास्तव्यास येत असल्याचे आढळून आले आहे. गेल्या तीन वर्षांत जवळपास ८०० गुंडांनी तडीपारीच्या आदेशाचा भंग केल्याचे आढळून आले आहे. तडीपार केल्यानंतर शहरात वावरणाऱ्या गुंडांविरुद्ध कडक कारवाई करण्याचा आदेश देण्यात आला आहे.

### गुंडांविरुद्ध तक्रार करण्याचे आवाहन

» 'शहरातील वस्ती भागातील रहिवासी, व्यापाऱ्यांना धमकाविण्याचे प्रकार घडतात. गुंडांनी धमकाविल्यास त्वरित पोलिसांकडे तक्रार करावी,' असे आवाहन अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांनी केले. 'शहरवासीयांमध्ये विश्वास निर्माण करणे, तसेच त्यांना आधार देण्यासाठी वस्ती भागात पोलिसांनी बैठका घेऊन मार्गदर्शन करावे,' अशा सूचना स्थानिक पोलीस ठाण्यांना देण्यात आल्या आहेत.

# आरटीओत ऑनलाइन सुविधांचे तीनतेरा

## कार्यालयाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांचे हेलपाटे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) ऑनलाइन सुविधांचा बोजवारा उडाला असून, यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सर्व्हर डाऊन होणे, अर्ज न भरले जाणे, फोटो अपलोड न होणे यासारख्या तांत्रिक समस्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. यावर कार्यालयाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांना वारंवार कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत आहेत. ऑनलाइन सुविधांच्या या गोंधळामुळे नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.

आरटीओने नागरिकांचा वेळ आणि त्रास वाचावा म्हणून वाहन नोंदणी, चालक परवाना अर्ज, परवाने नूतनीकरण, वाहन स्थानांतरण, योग्यता प्रमाणपत्र, कर संबंधित सेवा, चलन भरणा आणि तपासणी या सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र, या सुविधांचा वापर करताना नागरिकांना सातत्याने तांत्रिक अडथळ्यांना तोंड द्यावे लागत आहे. ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरही पुन्हा कार्यालयात जावे लागत असल्याने नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहेत. या समस्या कधी सुटणार, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

आरटीओची बुहतांश सर्वच कामे ऑनलाइन जरी झाली असती, तरी ऑनलाइन भरलेले अर्ज देण्यात कार्यालयात यावे लागते. मात्र, आरटीओची ऑनलाइन सेवा बारगळली असल्याने नागरिकांना वारंवार हेलपाटे मारण्याची वेळ आली आहे. त्यात अधिकारीही व्यवस्थित सांगत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे एकाच कामासाठी नागरिकांना पुन्हा पुन्हा आरटीओ कार्यालयात यावे लागत असल्याने अनावश्यक गर्दी वाढत आहे.

नागरिकांना येणाऱ्या प्रमुख अडचणींमध्ये संकेतस्थळाचा धीमा वेग किंवा डाऊन होणे, सर्व्हरमधील बिघाडामुळे अर्ज न भरले जाणे, अर्ज केवळ इंग्रजी भाषेत असल्याने येणारा त्रास आणि मोबाइलवर ओटीपी न मिळणे यांचा समावेश आहे. एका नागरिकाने सांगितले की, “मित्राच्या वाहन परवान्यासाठी आलो होतो. ओटीपी पाठवल्याचे सांगितले गेले, पण तो मोबाइलवर आलाच नाही. अधिकाऱ्यांनीही नीट माहिती दिली नाही.”

दरम्यान, नागरिकांचा ऑनलाइन सुविधांवरील विश्वास उडत असून, या समस्यांचे तातडीने निराकरण होणे गरजेचे आहे. केंद्रीय स्तरावर नवीन सर्व्हर सुरू झाल्याने कार्यालयीन कामकाजातील अडचणी कमी झाल्या आहेत. नागरिकांनी मोबाइल क्रमांक अपडेट केल्यास ओटीपी मिळेल. तसेच, अर्ज भरताना मराठी भाषेची लेबले असावीत, अशी मागणी वरिष्ठांकडे केली जाईल.”




### यामुळे वाढतेय आरटीओ कार्यालय परिसरात गर्दी

» पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात दररोज सुमारे पाचशे ते सहाशे नागरिक विविध कामांसाठी येत असतात. आरटीओची बुहतांश सर्वच कामे ऑनलाइन जरी झाली असती, तरी ऑनलाइन भरलेले अर्ज देण्यात कार्यालयात यावे लागते. मात्र, आरटीओची ऑनलाइन सेवा बारगळली असल्याने नागरिकांना वारंवार हेलपाटे मारण्याची वेळ आली आहे. त्यात अधिकारीही व्यवस्थित सांगत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे एकाच कामासाठी नागरिकांना पुन्हा पुन्हा आरटीओ कार्यालयात यावे लागत असल्याने अनावश्यक गर्दी वाढत आहे.

### केंद्रीय स्तरावर नवीन सर्व्हर सुरू

» यावर प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण म्हणाले, “पीयुसीसाठी सर्व्हर डाऊनची समस्या होती, पण ती आता सुधारली आहे. केंद्रीय स्तरावर नवीन सर्व्हर सुरू झाल्याने कार्यालयीन कामकाजातील अडचणी कमी झाल्या आहेत. नागरिकांनी मोबाइल क्रमांक अपडेट केल्यास ओटीपी मिळेल. तसेच, अर्ज भरताना मराठी भाषेची लेबले असावीत, अशी मागणी वरिष्ठांकडे केली जाईल.”

# रावेत, किवळे, पुनावळेतून हिंजवडीसाठी अतिरिक्त बसची मागणी

## प्रवाशांच्या संख्येनुसार या मार्गावर अतिरिक्त बस सोडाव्यात, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

रावेत, किवळे, पुनावळे व आदर्शनगर परिसरातून हिंजवडीसाठी सुरू केलेली बससेवा अपुरी पडत असून, प्रवाशांच्या संख्येनुसार या मार्गावर अतिरिक्त बस सोडाव्यात, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे.

शहराच्या रावेत, किवळे, पुनावळे व आदर्शनगर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या ही अधिक आहे. आय. टी. क्षेत्रातील बहुतांशी मोठ्या कंपनीची कार्यालये ही हिंजवडी आय. टी. पार्क मध्ये आहेत. रावेत व किवळे परिसरातून हिंजवडीसाठी थेट बससेवा उपलब्ध नव्हती. त्यामुळे कर्मचारीवर्गाची ही अडचण मांडली होती.

या बातमीची दखल घेत, पीएमपीएमएल प्रशासनाने किवळे ते हिंजवडी बससेवा सुरू केली असून, त्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. माफक दरात वातानुकूलित बससेवा असल्यामुळे प्रवाशांनी सुधा सार्वजनिक वाहतुकीकडे आपला मोर्चा वळविला आहे, मात्र प्रशासनाने कर्मचारी वर्गाच्या कामाच्या वेळेनुसार बसचे वेळापत्रक न आखल्याने विशेषत: आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांना त्याचा फटका बसत आहे. तसेच सध्या एकच बस उपलब्ध असल्यामुळे बसच्या फेऱ्या कमी असून, यामध्ये वाढ करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

रावेत, किवळे, पुनावळे व आदर्शनगर परिसरातून हिंजवडीसाठी सुरू केलेली बससेवा अपुरी पडत असून, प्रवाशांच्या संख्येनुसार या मार्गावर अतिरिक्त बस सोडाव्यात, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे. शहराच्या रावेत, किवळे, पुनावळे व आदर्शनगर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या ही अधिक आहे.



> किवळे, रावेत, आदर्शनगर व पुनावळे येथून हिंजवडीकडे जाणाऱ्या अधिकच्या फेरीच्या मागणीचा सकारात्मक विचार करण्यात आला असून लवकरच किवळे व रावेत येथील नागरिकांसाठी मुक्काई चौक बस स्थानकातून नवीन बस चालू करण्यात येईल.
>
> - सतीश गव्हणे, मुख्य व्यवस्थापक, पीएमपीएमएल

> आय. टी. कर्मचाऱ्यांची कामाची शिफ्ट ही वेगवेगळी असते. त्यामुळे सर्वच प्रवाशांचे बसच्या वेळापत्रकाबरोबर जुळत नाही. नवीन बस चालू करून फेऱ्या वाढवल्या तर कर्मचारी वर्गाला फायदा होईल. तसेच बसचे मार्ग अनेक गाव आणि वस्त्यांमधून असल्यामुळे विद्यार्थी आणि स्थानिक प्रवाशीदेखील या बसने मुकाई चौक बस स्थानकापर्यंत येऊ शकतील.
>
> - ललित देशमुख, रहिवासी, किवळे

# जय गणेश जलाशयात केवळ 22 टक्के पाणीसाठा

## गतवर्षी आजअखेर 8 टक्केच पाणीसाठा शिल्लक होता. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी 14 टक्के पाणीसाठा जास्त आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जानेवारी महिन्यापासून दिवसेंदिवस उष्णतेत वाढ होत असून, पाण्याचे बाष्पीभवन देखील वाढू लागले आहे. पिंगोरी (ता. पुरंदर) परिसराला सुजलाम सुफलाम करणाऱ्या जय गणेश जलाशयात 21 एप्रिलअखेर फक्त 22 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गतवर्षी आजअखेर 8 टक्केच पाणीसाठा शिल्लक होता. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी 14 टक्के पाणीसाठा जास्त आहे.



सन 1972 मध्ये जय गणेश तलावाची निर्मिती करण्यात आली असून, तेव्हापासून पिंगोरीतील शेती, पिण्याच्या पाण्यासाठी हा जलाशय वरदान ठरला आहे. या जलाशयामुळे पिंगोरी परिसरातील बागायत शेतीचे क्षेत्र वाढले आहे.

मागील दोन वर्षी अल्प पर्जन्यमान झाल्याने हा जलाशय पूर्णपणे भरला नव्हता. मागील वर्षी ऐन पावसाळ्यातच टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता. यावर्षी ऑगस्ट महिन्याअखेर गोकुळाष्टमी दिवशीच जय गणेश जलाशय ओसांडून वाहू लागल्यानंतर येथील ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात जलपूजन केले होते.

जय गणेश तलावाची निर्मिती करण्यात आली असून, तेव्हापासून पिंगोरीतील शेती, पिण्याच्या पाण्यासाठी हा जलाशय वरदान ठरला आहे. या जलाशयामुळे पिंगोरी परिसरातील बागायत शेतीचे क्षेत्र वाढले आहे.

दुष्काळी परिस्थितीमध्ये श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट व गावातील रहिवासी बाबा शिंदे यांच्या विशेष प्रयत्नाने तसेच रोटरी क्लबच्या सहकार्यातून सामाजिक संस्थांनी पुरविलेल्या यंत्रसामग्रीसह ग्रामस्थांनी केलेल्या श्रमदानातून गाळ काढून हा जलाशय पुनर्जीवित करण्यात आला. त्यामुळे परिसरातील हजारो एकर जमीन ओलिताखाली आली आहे. सद्यःस्थितीत जलाशयातील पाणीसाठा अल्प असल्याने तसेच पुढील महिनाभरात पाऊस पडला नाही, तर जलाशयातील पाणीसाठा मृत साठ्यात जाईल, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. पिंगोरी (ता. पुरंदर) परिसराला सुजलाम सुफलाम करणाऱ्या जय गणेश जलाशयात 21 एप्रिलअखेर फक्त 22 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गतवर्षी आजअखेर 8 टक्केच पाणीसाठा शिल्लक होता. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी 14 टक्के पाणीसाठा जास्त आहे.

> दिवसेंदिवस उष्णता वाढू लागल्याने भूगर्भातील पाण्याची पातळी खालावू लागल्याने पिंगोरी येथील जय गणेश जलाशयामधील काही प्रमाणात पाणी पिण्यासाठी सोडण्यात आले होते. यामुळे काही भागांतील जमिनीची पाणीपातळी वाढली असली तरी शिंदेनगर, कवडेवाडी येथील पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनत चालला आहे. या परिसरात श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टद्वारे लगेचच टँकर सुरू करण्यात येणार आहे. शासनाने या गावातील पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी ठोस उपाययोजना करावी.?.
>
> – संदीप यादव, सरपंच, पिंगोरी

> पिंगोरी परिसरात मागील वर्षी ऐन पावसाळ्यात टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता. ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस संततधार पाऊस पडल्याने जय गणेश जलाशय पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागला होता. यावर्षी पाण्याची कमतरता जाणवणार नाही, अशी शक्यता असताना वाढत्या उष्णतेने होत असलेले बाष्पीभवन तसेच जलाशयातून पाणी सोडल्याने सध्या जलाशयात 22 टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे.
>
> - - अविनाश जगताप, शाखाधिकारी, जलसंपदा विभाग, गराडे

# सासवडमध्ये रस्त्यालगत कचऱ्याचे ढीग; बेजबाबदार नागरिकांवर कारवाई करण्याची मागणी

## घंटागाडीची वेळ चुकणारे बेजबाबदार नागरिक, वाहन-चालकांकडून महामार्गालगत व मोकळ्या जागेत हा कचरा टाकला जात आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील मुख्य बाजारपेठ असलेले सासवड शहरात लोकवस्तीनजीक मोकळ्या जागा व महामार्गालगत विविध प्रकारचा कचरा निष्काळजीपणे टाकण्याचे प्रकार वाढले आहेत. घंटागाडीची वेळ चुकणारे बेजबाबदार नागरिक, वाहन-चालकांकडून महामार्गालगत व मोकळ्या जागेत हा कचरा टाकला जात आहे. त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत आहे.



कचरा विविध रस्ते, महामार्गालगत टाकला जात असल्याने अशा बेजबाबदार नागरिकांचा सीसीटीव्ही कॅमेरे बसवून बंदोबस्त केला पाहिजे, अशी मागणी सासवड नगरपालिकेकडे आरोग्यप्रमुख मोहन चव्हाण यांच्याकडे नागरिकांनी केली आहे. कचरा टाकणाऱ्या बेजबाबदार नागरिकांवर सासवड नगरपालिकेने व आरोग्य विभागाने कारवाई करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींकडून करण्यात येत आहे. तसेच, माजी उपनगराध्यक्ष दीपक टकले, माजी नगरसेवक सोनुकाका जगताप, शिवसेना सासवड शहराध्यक्ष मिलिंद इनामके, भाजपनेते जालिंदर जगताप, सामाजिक कार्यकर्ते डॉ. उदयकुमार जगताप आदींनी ही कारवाई करण्याची मागणी केली.

कालबाह्य केमिकल्स, औषधे, विविध तुटक्या वस्तू, खराब गाद्या, उशा, थर्माकोल, बाटल्या, पत्रावळी, प्लास्टिक मटेरिअल, राडारोडा टाकून घाटमार्गालगत पर्यावरणाला बाधा आणली जात असल्याचे पाहयला मिळत आहे. सासवड शहरात किर्लोस्कर कंपनीनजीक रस्त्यालगत वाहनातून कचरा टाकला जातो. असाच प्रकार गणेश मंगल कार्यालयापासून सोपाननगरचा रस्ता तसेच सोनोरी रस्ता, आंबोडी रस्ता, वाघडोंगर रस्त्यालगत मोकळ्या जागेत, तिथून महामार्गकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यालगत, कऱ्हा नदीतही रात्री कचरा टाकाल जात आहे. वर्षानुवर्षे कचरा संकलनासाठी दारोदारी घंटागाडी फिरत असतानाही बेजबादार नागरिक अशा प्रकारे कचरा टाकत आहेत.

### जुनी पद्धत काय ?

» शहरातील हॉटेल, परमिटरूम, बार, दुकाने, विविध व्यावसायिकांचाही कचरा, प्लास्टिक बाटल्या, प्लास्टिक पिशव्या बंदी असताना सर्रास वापरल्या जातात. असाही कचरा विविध रस्ते, महामार्गालगत टाकला जात असल्याने अशा बेजबाबदार नागरिकांचा सीसीटीव्ही कॅमेरे बसवून बंदोबस्त केला पाहिजे, अशी मागणी सासवड नगरपालिकेकडे आरोग्यप्रमुख मोहन चव्हाण यांच्याकडे नागरिकांनी केली आहे.

### नैसर्गिक घाटमार्गाच्या झाल्या कचराकुंड्या

» पुरंदर तालुक्यात येणारे विविध नैसर्गिक घाटमार्गाच्या स्थानिक व शहरी नागरिकांनी कचराकुंड्याच केल्याचे चित्र पाहयला मिळत आहेत. कालबाह्य केमिकल्स, औषधे, विविध तुटक्या वस्तू, खराब गाद्या, उशा, थर्माकोल, बाटल्या, पत्रावळी, प्लास्टिक मटेरिअल, राडारोडा टाकून घाटमार्गालगत पर्यावरणाला बाधा आणली जात असल्याचे पाहयला मिळत आहे.